http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ●किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# धनूभाऊ तुमचा इंदौरमध्ये मर्डर झाला असता, पण दिवंगत भय्यूजी महाराज यांनी तुम्हाला त्यावेळी वाचवलं!!!

- माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा जीव वाचवणाऱ्या भय्यूजी महाराजांचा अंत मात्र अकस्मात झाला : आ. रत्नाकर गुट्टे
- गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांनी धनंजय मुंडे यांच्याबाबत जे वक्तव्य केले आहे, त्यावरून राज्यात उडाली खळबळ!!
- गोळी झाडून भय्यूजी महाराजांनी आत्महत्या केल्याचा आरोप असला, तरी त्यांच्या मृत्यू भोवतीचं गूढ अनेक वर्षांनीही दूर झालेलं नाही!!

## आमदार रत्नाकर गुट्टे यांनी इतक्या वर्षानंतर हा बॉम्ब आत्ता का फोडला?

### भय्यूजी महाराज प्रकरणाचा तपास सुरूच!!

●प्रसिद्ध आध्यात्मिक गुरु भय्यूजी महाराज यांनी १२ जून २०१८ रोजी आत्महत्या केली होती. पत्नीच्या निधनानंतर एकाकीपणा जाणवत असल्याने आणि दुसऱ्या लग्नावरुन मुलीची नाराजी असल्यामुळे भय्यू महाराज तणावाखाली असल्याचं बोललं जात होतं. या तणावातून त्यांनी राहत्या घरातच स्वत:वर गोळी झाडून घेतली होती. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

### भय्यूजी महाराजांनी कुहूला वचन दिले होते की, ती घरी आल्यावर आयुषी तिथे नसेल!!

●नोव्हेंबर २०१६ मध्ये पत्नीच्या निधनानंतर एका वर्षाने, त्यांनी शिवपुरी येथील डॉ. आयुषी शर्मा यांच्याशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. कुहूने या लग्नाला तीव्र विरोध केला. तिने सांगितले की ती आईच्या जागी कोणालाही स्वीकारु शकत नाही. तरीही त्यांनी आयुषीशी लग्न केले. लग्नानंतर कुहूने वडिलांपासून अंतर राखले. कुहूने वडिलांना सांगितले की तिला आयुषी घरात नको. भय्यूजी महाराजांनी कुहूला वचन दिले होते की ती घरी आल्यावर आयुषी तिथे नसेल.

### आयुष्यात संघर्ष सुरु असल्याचे एका मुलाखतीत भय्यूजी महाराजांनी सांगितले!!

●एका मुलाखतीत भय्यूजी महाराजांनी सांगितले होते की, त्यांच्या आयुष्यात संघर्ष सुरु होता. त्यांची आई आजारी होती, वडील वारले होते, तर त्यांना स्वत:ला अपघात झाला होता. त्यांना वाटले की ते एकटे सर्व गोष्टी सांभाळू शकत नाहीत, त्यामुळे त्यांनी दुसरे लग्न केले. लग्नानंतर ट्रस्टमध्ये समस्या सुरु झाल्या. आयुषीवर ट्रस्टच्या कामात हस्तक्षेप केल्याचा आरोप झाला. अधिकारी बदलण्यात आले. भय्यूजी महाराज कुहूला लंडनला शिक्षणासाठी पाठवण्याची योजना आखत होते.

### अन् पलक भय्यू महाराज यांच्या रूममध्ये राहू लागली!!

●नोव्हेंबर २०१५ मध्ये हृदयविकाराच्या झटक्याने त्यांच्या पहिल्या पत्नी माधवी यांचे निधन झाले. त्यानंतर भय्यूजींनी आपली मुलगी कुहूचे एकट्याने संगोपन केले. कुहू पुण्यात शिक्षण घेत होती. याच काळात त्यांची अनुयायी पलक त्यांच्या जवळ आली आणि वर्षभरातच ती त्यांच्या खोलीत राहू लागली.

### मुलगी कुहू यांना दोघांच्या नात्यांबद्दल माहिती मिळाली!

●दरम्यान डॉ. आयुषी त्यांच्या आयुष्यात आल्या. भय्यूजी महाराज पलकपासून दूर राहू लागले. पलक त्यांच्यावर लग्नासाठी दबाव टाकत असल्याचे बोलले जात होते. त्याच वेळी मुलगी कुहू यांना दोघांच्या नात्यांबद्दल माहिती मिळाली.

### सुसाइड नोटमध्ये मालमत्तेचे हक्क त्यांचे नोकर विनायक यांना देत असल्याचे नमूद!

१२ जून २०१८ रोजी दुपारी त्यांच्या घरातून गोळीबाराचा आवाज आला. नोकरांनी दरवाजा बंद असल्याचे पाहिले. दरवाजा तोडून आत शिरल्यावर त्यांना भय्यूजी महाराज रक्ताच्या थारोळ्यात पडलेले दिसले आणि त्यांच्याजवळ एक रिव्हॉल्व्हर होते. पोलिसांनी त्यांच्या डायरीत इंग्रजीमध्ये लिहिलेली एक सुसाइड नोट जप्त केली. त्यात त्यांनी तणावाखाली असल्याचे म्हटले होते आणि मालमत्तेचे हक्क त्यांचे नोकर विनायक यांना देत असल्याचे नमूद केले होते.







### कोण होते भय्यूजी महाराज?

●भय्यूजी महाराज यांचे खरे नाव उदयसिंग देशमुख होते. त्यांचा जन्म २९ एप्रिल १९६८ रोजी मध्य प्रदेशातील शुजालपूर येथे झाला. सुरुवातीला त्यांनी मॉडेलिंगमध्ये नशीब आजमावले, पण त्यात यश आले नाही. त्यानंतर त्यांनी अध्यात्माकडे वळण्याचा निर्णय घेतला. भय्यूजींनी महाराष्ट्रात अण्णा महाराज यांचे शिष्यत्व स्वीकारले. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग घेतल्याने ते लवकरच प्रसिद्ध झाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना 'राष्ट्रीय संत' म्हणून घोषित केले होते. त्यांनी इंदूर येथे एक ट्रस्ट स्थापन केला, ज्याचा विस्तार मध्यप्रदेश आणि महाराष्ट्रात झाला.

**मुंबई : धनूभाऊ तुमचा इंदौरमध्ये मर्डर झाला असता, पण दिवंगत भय्यूजी महाराज यांनी त्यावेळी तुम्हाला वाचवलं होतं, असा दावा गंगाखेडचे आमदार रत्नाकर गुट्टे यांनी माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याबाबत नुकताच जाहीर सभेत केला होता. त्यानंतर भय्यूजी महाराज यांच्या आठवणी ताज्या झाल्या आहेत. धनंजय मुंडेंचा जीव वाचवणाऱ्या भय्यूजी महाराजांचा मात्र अकस्मात अंत झाला. राहत्या घरात बंद खोलीत गोळी झाडून त्यांनी आत्महत्या केल्याचा आरोप असला, तरी त्यांच्या मृत्यूभोवतीचं गूढ अनेक वर्षांनीही दूर झालेलं नाही, असे वक्तव्य आमदार रत्नाकर गुट्टे यांनी जाहीर सभेमधून व्यक्त केले. परंतु, हे वक्तव्य अनेक वर्षानंतर आज का केले? हा महत्त्वाचा प्रश्न सर्वसामान्य पडला आहे.**

## नगर परिषदेचा निकाल लांबणीवर पडल्याने मतपेट्यांचा मुक्काम वाढला

**पैठण : सर्जेराव खडसन**

पैठण नगर परिषद निवडणुकीच्या एकूण ४४ मतदान केंद्रावर काही केंद्र अपवाद वगळता ही मतदान प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत शांततेत पार पडली. परंतु पैठणसह राज्यातील अनेक ठिकाणच्या नगर परिषद नगरपालिका निवडणुकीत काही तक्रारी व तांत्रिक अडचणी असल्याने दि.(३) रोजी लागणारा निकाल तब्बल एकोनावीस दिवस लांबणीवर पडून या सर्व नगर परिषद निवडणुकीचा निकाल दि.(२१) रोजी लागणार आहे. त्यामुळे या सर्व मतपेट्या पैठणचे पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या चोख बंदोबस्तात दि.(२) रोजी १०:२८ वा. उपविभागीय अधिकारी पैठण फुलंब्री तथा मुख्य निवडणूक अधिकृत नीलम बाफना, पैठण तहसीलदार ज्योती पवार, नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. पल्लवी अंभोरे, गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत स्ट्रॉंग रूममध्ये जमा करून हे स्ट्रॉंगरूम सील करण्यात आले आहे. सदर स्ट्रॉंग गार्ड रूम येथे सीआरपीएफ एक सेक्शन तसेच आऊटरसाठी एक अधिकारी आणि चार सशस्त्र अमलादारांची नेमणूक करण्यात आली आहे.



## श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे गुरूवार रोजी शिवाजी महाराज कोकणे यांचे कीर्तन

**बीड : प्रतिनिधी**

विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या 28 व्या वर्षातील चौथ्या पुण्यतिथी मार्गशीर्ष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.रामायणाचार्य शिवाजी महाराज कोकणे चिखली, ज्ञानाई, तुकाई गुरूकुल आष्टी यांचे गुरुवार दिनांक 4 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 12 ते 2 या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी बेलवाडी यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन



केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरु होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

वडवणी तालुका कृषी कार्यालय ➤ मनमानी कारभाराची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

## वडवणी कृषी कार्यालयात 'हम करे सो कायदा' असल्यामुळे शेतकऱ्यांचा छळ शिगेला!!

**वडवणी : अशोक फपाळ**

तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी असणारे तालुका कृषी अधिकारी कार्यालयात अधिकारी, कर्मचारी गैरहजर असतात तसेच कृषी सहाय्यक हे सज्जाचे गावी जात नाहीत तसेच कार्यालयात कामासाठी आलेल्या शेतकऱ्यांची आडवणुक केली जाते. या ठिकाणी कार्यरत असणारे अधिकारी व कर्मचारी हम करे सो कायदाची शेतकऱ्यांना प्रचिती येत असल्याने या मनमानी कारभाराची जिल्हाधिकाऱ्याकडे तक्रार करण्यात आली असून यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी नसता शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा महादेव सावंत यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी असणारे तालुका कृषि अधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी हे तालुका कृषि कार्यालयात, तसेच कृषि सहाय्यक हे प्रत्येक गावोगावी जात नसुन ते कार्यालयात देखीत सतत गैरहजर असतात तसेच अतिवृष्टीने नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांचे अनुदान यादीला नांवे आलेले नाहीत ते शेतकरी कृषि कार्यालयात कागदपत्रे देण्यासाठी जातत त्यावेळी कोणीही कर्मचारी, तेथे कधीही उपस्थित नसतात त्यामुळे शेतकऱ्यांची एक प्रकारे आडवणुक होत असुन यास कृषि कार्यालय जबाबदार आहे. तसेच पंतप्रधान सन्मान निधीचे तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना पैसे खात्यावर येत नाहीत यासाठी करण्यात येणारी ऑनलाईनच्या केवायसी साईट देखील सतत बंद असते त्यामुळे अनेक शेतकरी यापासुन वंचित राहत आहेत. तरी सदरील प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी वेबसाईट ही २४ तास चालु ठेवण्यात यावी. तसेच सदरील अधिकारी, कर्मचारी, कृषि सहाय्यक यांना शेतकऱ्यांचे कामे करण्यासाठी प्रत्यक्ष कार्यालयात व सज्जाच्या ठिकाणी हजर राहण्याचे आदेश देवुन ज्या शेतकऱ्यांचे अतिवृष्टी अनुदानातुन नांवे यादीत आलेले नाहीत त्यांचा सर्वे करुन पुर्तता करण्यात यावी व जे अधिकारी, कर्मचारी, कृषि सहाय्यक हे कार्यालय व सज्जाच्या गावी हजर राहत नाहीत याची चौकशी करून तात्काळ कारवाई करण्यात यावी नसता शेतकऱ्यांना सोबत घेऊन भाजपाच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल असा इशारा दि.२८ रोजी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या लेखी निवेदनाद्वारे दिला आहे.

### कामकाजाचे दिवस ठरलेले?

● या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी सतत गैरहजर असल्याचे शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे. तर आठवड्यातील सोमवार, बुधवार आणि शुक्रवार या तीन दिवशीच अधिकारी व कर्मचारी या कार्यालयात दिसून येतात. अशी खात्रीलायक माहिती मिळाली आहे. शासन तर यांना दर दिवशीचा पगार देते. मग अधिकारी आणि कर्मचारी एक दिवसाआड कार्यालयात हजेरी का लावतात? उपस्थित दिवशीच शेतकऱ्यांचे कामे होतात हे कशावरून समजायचे? याकडे देखील वरिष्ठ पातळीवरील अधिकारी व बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी लक्ष देणार का? असा प्रश्न उपस्थित राहत आहे.

ई पेपर वाचा
सांज दैनिक बीड
वास्तव
http://epaper.beedvastav.com

# आजचे राशि भविष्य

## मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

## वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

## कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

## सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

## तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

## वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

## धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

## कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

## मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.



# रात्री शांत झोप येत नाही का?

**आज-काल धावपळीच्या युगात रात्री शांत झोप न येणे ही एक कॉमन समस्या झालेली आहे का? रात्री शांत झोप येणे ही सर्व वयोगटातील समस्या आहे का? ज्या व्यक्तीला रात्र रात्र झोप येत नाही झोप येण्यासाठी तो तडफडत असतो झोप येत नाही. म्हणून कासावीस होऊन अस्वस्थ होत असतो. अनिद्रांचे परिणाम व्यक्तीच्या शरीर मनावर पडत असतात. याला झोपेचे महत्तव काय आहे हे समजत असते.**



मनीषा बिक्कड-घुले
● कौन्सलर-सायकॉलॉजिस्ट-9545440471

रोज व्यक्तीला सहा ते आठ तासाची झोप घेणे आवश्यक असते हे आपल्याला माहीतच आहे परंतु दिवसभराच्या कामाच्या दगदगीनंतर अनेकांना रात्री लवकर झोप येत नाही रात्री व्यवस्थित झोप आली नाही तर दिवसभर फ्रेश वाटत नाही. मग शांत झोप न झाल्यावर थकवा येतो कोणत्याही कामात उत्साह जाणवत नाही असे आपल्या सोबत होत आहे का?

**● मग झोप कोणात्या व्यक्तीला येत नाही**

ज्या व्यक्तीला धोका, काळजी, भीती, त्रास, इर्शा, द्वेष, दु:ख, टेन्शन, भावनिकता, एकटेपणा आणि अस्वस्थ मानसिकतेत जीवन जगत असतात त्यांना झोप येत नाही का?

**● मग शांत झोप येत नाही म्हणून खाली काही कामे करतो का?**

1. अनेक चुकीच्या कृती पुन्हा पुन्हा केल्या जातात का?
2. झोप येत नाही म्हणून मोबाईलवर टाईमपास केला जातो का?
3. मोबाईलवर टाईमपास होतो म्हणून पुन्हा झोप मोड होते का?
4. झोप येत नाही तेव्हा जास्तच नकारात्मक वेदनादायी व अस्वस्थ, बेचैन करणारे त्याचबरोबर आत्महत्या सारखे विचार जास्त येतात का?
5. झोप न झाल्यामुळे आपल्या शारीरिक आणि मानसिकतेवर क्षमतेवर, आरोग्यावर, भविष्यातील योजनेवर, कामाच्या दर्जावर



परिणाम पडतो का?

6. झोप न झाल्यामुळे शारीरिक व मानसिक थकवा अधिक जाणवतो का?
7. रात्री कौटुंबिक विसंवाद चिडचिड झाल्यास अति भीती काळजी, टेन्शन, दु:ख, त्रास, चिडचिड, एकटेपणा, असुरक्षितता, प्रेमाचा अभाव अशा भावना झोपण्यापूर्वी सतत मनात निर्माण होत असतील तर झोप व्यवस्थित होईल का?
8. नकारात्मक विचार अपेक्षा व भावना यांची घुसमट होत आहे का? याचा परिणाम आपल्या झोपेवर पडतो का?
9. भूतकाळात नको असलेल्या घटना पुन्हा पुन्हा डोळ्यासमोर येतात का यामुळे झोप शांत होत नाही का?
10. भूतकाळात जे झाले ते पुन्हा येऊ शकत नाही हे माहीत असून सुद्धा ते विसरत नाही का?

निसर्गचक्रानुसार अंधार पडला की तीन तासात गरजे इतका झोपेचा हार्मोन्स स्त्रावत असतो त्यामुळे झोप येत असते. विचार, आहार, व्यायाम आणि झोप प्रत्येक व्यक्तीला खूप गरजेची आहे. या सिक्वेन्स मध्ये कमी जास्त प्रमाणामध्ये बदल झाला की मेंदूमध्ये काही संप्रेरक कमी जास्त प्रमाणामध्ये स्त्रावतात त्यामुळे नको असलेल्या घटना समस्या आपल्याला उद्‌भवत असतात. मग तुमच्या जीवनामध्ये सुद्धा असं काही होत असेल तर खालील दिलेल्या नंबर वर कॉल करा.

वेळेवर त्याचे निराकरण केलं नाही तर निद्रानाश व बरच काही होऊन आपल्याला मानसिक गंभीर आजार होऊ शकतात आणि शारीरिक आजाराला तोंड फुटते म्हणून आपण वेळीच यावर उपाय केला पाहिजे.

# हेरगिरीसाठी कसे वापरले जाते पेगासस स्पायवेअर?

## तुमच्या फोनमध्ये ते आहे की नाही हे कसे जाणून घ्याल?

ॲपल आयोन वापरकर्त्यांना पुन्हा एकदा पेगाससारख्या स्पायवेअर हल्ल्याचा धोका आहे. इस्रायली कंपनी एनएसओ ग्रुपने हे धोकादायक स्पायवेअर विकसित केले होते. या स्पायवेअरशी संबंधित अनेक प्रश्न आजही लोकांच्या मनात फिरत आहेत, जसे की पेगासस स्पायवेअरद्वारे हेरगिरी कशी केली जाते आणि फोनवर पेगासस हल्ला झाला आहे की नाही हे कसे शोधायचे?

तुमच्या माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की पेगासस स्पायवेअर केवळ अँड्रॉइड डिव्हाइसच नव्हे, तर अँश्रिश आयोन देखील सहजपणे हॅक करू शकतो. पेगासस अशा प्रकारे डिझाइन केले गेले आहे की ते फोनमध्ये उपस्थित असलेल्या मोबाइल ॲलप्सची माहिती वाचण्यास सक्षम आहे, इतकेच नाही, तर ते जगातील सर्वात शक्तिशाली स्पायवेअर देखील मानले जाते.

### पेगासस म्हणजे काय?

पेगासस एक स्पायवेअर आहे आणि प्रत्येक स्पायवेअर प्रमाणे, त्याचे काम फोनमध्ये प्रवेश करणे आणि लोकांची हेरगिरी करणे आहे. हे हेरगिरी सॉफ्टवेअर तुमच्या नकळत लॅपटॉप आणि स्मार्टोनमध्ये इन्स्टॉल केले जाते. एकदा हे स्पायवेअर कोणत्याही उपकरणात शिरले की मग समजून घ्या की वैयक्तिक डेटाची चोरी निश्चित आहे.

### कशी होते हेरगिरी?

आता प्रश्न पडतो की पेगासस लोकांची हेरगिरी कशी करतो? एकदा पेगाससने ोनमध्ये प्रवेश केल्यानंतर, हे स्पायवेअर लक्ष्यित फोनमधून डेटा चोरण्यास आणि दुसऱ्या पक्षाला पाठविण्यास प्रारंभ करते. तुमच्या फोनमधून ईमेल, टेक्स्ट मेसेज, ोटो, व्हिडिओ, पासवर्ड आणि कॉन्टॅक्ट यासारख्या गोष्टी चोरल्या जातात.

### एनएसओ ग्रुप म्हणजे काय?

एनएसओ ग्रुप ही एक सायबर सुरक्षा कंपनी आहे जी जगभरातील सरकार आणि सुरक्षा संस्थांना दहशतवाद आणि गुन्हेगारीशी लढण्यासाठी मदत करण्याचा दावा करते.

### अशा प्रकारे फोनमध्ये इन्स्टॉल केले जाते स्पायवेअर

फोनच्या सॉफ्टवेअरमध्ये बग असल्यास हॅकर्स डिव्हाइसवर सहजपणे स्पायवेअर इन्स्टॉल करू शकतात. स्पायवेअर स्थापित करण्यासाठी दुर्भावनापूर्ण (धोकादायक) दुवे हस्तांतरित केले जातात. कोणत्याही स्मार्टोन वापरकर्त्याने या लिंकवर क्लिक करण्याची चूक करताच, हा स्पायवेअर आपोआप डिव्हाइसमध्ये स्थापित होतो.

एकदा का स्पायवेअर डिव्हाईसमध्ये शिरला की तुमच्या ोनचे नियंत्रण थेट हॅकर्सच्या हाती जाते. ब-याच वेळा हॅकर्स ॲदप्समध्ये पॉप-अप संदेश पाठवून स्पायवेअर स्थापित करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे अशा कोणत्याही लिंकवर क्लिक करण्याची चूक करू नये, असा सल्ला दिला जातो.



### तुमच्या फोनमध्ये पेगासस आहे की नाही ते कसे शोधाल?

फोनमधील पेगासस शोधणे खूप कठीण असले, तरी स्पायवेअर फोनमध्ये प्रवेश केल्यानंतर, तुमचा फोन तुम्हाला काही सिग्नल देऊ लागतो, जे तुम्हाला ओळखणे आवश्यक आहे.

जर फोनमध्ये पेगासससारखे स्पायवेअर असेल, तर तुमच्या फोनची बॅटरी झपाट्याने कमी होऊ लागते.

फोनवर स्पायवेअर अटॅक झाल्यास डेटाचा वापर वाढतो. डेटा वापर वाढण्याचे सर्वात मोठे कारण म्हणजे स्पायवेअर हे एक धोकादायक सॉफ्टवेअर आहे, जे फोनमध्ये नेहमी सक्रिय असते, ज्यामुळे डेटाचा वापर वाढू लागतो.

जर अचानक फोनची इंटरनल मेमरी कमी झाली, तर हे लक्षण आहे की असे काही ॲपप आहे, जे फोनमध्ये जास्त जागा घेत आहे. अशा स्थितीत फोनच्या सेटिंगमध्ये जाऊन तपासा हे कोणते ॲप आहे? तुम्ही फोनवर इन्स्टॉल केलेले कोणतेही ॲप असल्यास ते ॲपप अनइंस्टॉल करण्याचा प्रयत्न करा, अन्यथा फोन फॅक्टरी रीसेट करा.

### स्पायवेअर टाळण्यासाठी ॲपलकडे आहे उपाय

तुमच्याकडेही आयोन असेल आणि तुम्हाला स्पायवेअर टाळायचे असेल, तर लगेच ोनच्या सेटिंग्जवर जा. फोनच्या सेटिंगमध्ये जाऊन तुम्हाला प्रायव्हसी ॲंड सिक्युरिटी ऑप्शनमध्ये लॉकडाउन मोड दिसेल.

### काय आहे लॉकडाउन मोड फिचर?

लॉकडाउन मोडवर क्लिक करताच तुम्हाला हे फिचर चालू करण्याचा पर्याय मिळेल.

या वैशिष्ट्याच्या मदतीने ॲलपल आपल्या आयोन वापरकर्त्यांना स्पायवेअर आणि सायबर हल्ल्यांपासून सुरक्षित ठेवण्यास मदत करते.

# डास दूर करण्यासाठी करू नका कॉइलचा वापर, धोकादायक रोगाचा धोका

उन्हाळा आला की डासांचा त्रासही वाढतो. आपण त्यांना टाळण्याचा कितीही प्रयत्न केला तरी यामुळे आपले जगणे कठीण होते. ते टाळण्यासाठी आपण कॉइल वापरतो. त्यांचा वापर करून आपण डासांपासून वाचतो, पण ते आपल्या आरोग्यासाठी खूप धोकादायक आहे. बीएलके मॅक्स सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमधील रेस्पिरेटरी विभागातील वरिष्ठ संचालक डॉ. संदीप नायर म्हणतात की, डासांपासून बचाव करणाऱ्या कॉइलचा वापर केल्याने क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) होऊ शकतो.





जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (सीओपीडी) हे जगभरात मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे. 2019 मध्ये 3.23 दशलक्ष लोकांचा यामुळे मृत्यू झाला. इतकेच नाही तर 70 वर्षांपेक्षा कमी वयाच्या लोकांमध्ये सीओपीडी मृत्यूंपैकी 90 टक्के मृत्यू हे कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होतात.

काय आहेत या आजाराची लक्षणे

धाप लागणे

सतत खोकला

थकवा जाणवणे

डॉ. संदीप नायर म्हणतात की बहुतेक प्रकरणांमध्ये सीओपीडी धूम्रपान करणाऱ्या लोकांमध्ये होतो. मात्र ग्रामीण भागातील महिलांनाही या आजाराने ग्रासले आहे. डॉ. नायर यांच्या म्हणण्यानुसार, गावातील महिला चुलीवर अन्न शिजवतात आणि चुलीच्या धुरामुळे हा धोकादायक फुसाचा आजार होतो. मात्र, डासांना दूर पळवणारी कॉइल हेही या आजाराचे प्रमुख कारण असल्याचे डॉ. नायर सांगतात. याहूनही मनोरंजक गोष्ट म्हणजे तुमच्या खोलीत धुम्रपान करणारी कोणतीही वस्तू या आजाराचे कारण असू शकते. सीओपीडीमुळे फुसाचा कर्करोग, फुसाचा संसर्ग यांसारखे धोकादायक आजार होऊ शकतात.

डॉ. नायर सांगतात की, डासांना घालवण्यासाठी खोल्यांमध्ये वापरण्यात येणारी कॉइल अत्यंत धोकादायक आहे. ते म्हणतात की ते 100 सिगारेटस इतके धोकादायक आहे. डॉ. नायर लोकांना कॉइल न लावण्याचा सल्ला देतात. ते म्हणतात की ते वापरण्याऐवजी डासांना दूर करण्यासाठी मच्छरदाणी वापरणे चांगले होईल. डब्ल्यूएचओच्या अहवालानुसार, सीओपीडी पूर्णपणे बरा होऊ शकत नाही, परंतु काही उपचारांद्वारे तो नियंत्रणात ठेवला जाऊ शकतो.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

विशेष



# सकाळी उठताच या ६ गोष्टी दिसल्या तर येणार चांगले दिवस

ज्योतिषशास्त्रात सकाळी सकाळी काही गोष्टी दिसणे शुभ मानले जाते. असे म्हणतात की या गोष्टी सकाळी दिसल्यास काहीतरी शुभ वार्ता मिळणार आहे. जाणून घेऊया अशाच काही गोष्टींबद्दल ज्या पाहिल्याने सुख-समृद्धी वाढते.

● जर झोपेतून उठल्यावर तुम्हाला देवाची मूर्ती, शंख दिसला अथवा मंदिराच्या घंटेचा आवाज ऐकू आला तर हे शुभ मानले जाते.

● सकाळी सकाळी उठल्यावर घराच्या दरवाजावर सफेद गाय दिसणेही अतिशय उत्तम मानले जाते. यामुळे मनुष्याच्या सुख-संपन्नतेत वाढ होते.

● सकाळी उठताच तुम्हाला जर दूध, दही दिसत असेल तर हे येणाऱ्या काळात चांगल्या नशिबाच्या दिशेने इशारा करते.

### अंगणात पक्षी दिसत असेल

● अंगणात पक्षी दिसत असेल सकाळी जर घराच्या छतावर अथवा अंगणात पक्षी दिसत असेल तर समजून जा की तुम्हाला लवकरच शुभ बातमी मिळणार आहे.

● सकाळच्या वेळेस सफेद फूल, अथवा जवळचा मित्र अथवा हत्ती दिसणेही उत्तम मानले जाते. या संकेतांकडे कधीही दुर्लक्ष करू नका.

### हातांमध्ये दैवी शक्तींचा वास असतो

● याशिवाय हस्तरेखा शास्त्रानुसार हातांमध्ये दैवी शक्तींचा वास असतो. त्यामुळे सकाळी सकाळी हाताकडे पाहणेही शुभ मानले जाते.

# म्यानमारमधून येणाऱ्या ड्रग्ज तस्करांचा पर्दाफाश

## ➤ घनदाट जंगलाचा रस्ता, नदीतून बोटीचा प्रवास कशी केली कारवाई? जाणून घ्या सविस्तर

गुवाहाटी : नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या गुवाहाटी झोनल युनिटने एका समन्वित कारवाईत म्यानमारमधून भारतात कार्यरत असलेल्या आंतरराष्ट्रीय ड्रग्ज तस्करी नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. ही टोळी मणिपूरच्या घनदाट जंगलांचा आणि आसामच्या नद्यांचा वापर करून सुरक्षा यंत्रणांना चकवा देत मोठ्या प्रमाणात हेरॉइनची तस्करी करत होती. मिळालेल्या माहितीनुसार, एनसीबीने तस्करांच्या हालचालींवर लक्ष ठेवले आणि अखेर १ डिसेंबर रोजी मोठी कारवाई करत ताब्यात घेतले.

ड्रग्जची तस्करी करणारे म्यानमारमधून मणिपूरच्या कठीण जंगल मार्गांनी बराक नदीपर्यंत पोहोचायचे. त्यानंतर ते चेकपॉइंट्स, सुरक्षा छावण्या आणि पोलिसांच्या शहरी पाळतीला चकवा देत लहान स्वदेशी मोटरबोट वापरून सिलचरला ड्रग्ज पोहोचवायचे. ही रणनीती लक्षात घेऊन, एनसीबी टीमने नदीच्या मार्गावर एक अचूक कारवाईची योजना आखली.

सिलचरजवळील बराक नदीवर एका संशयास्पद मोटारबोटीला थांबवून त्याची झडती घेण्यात आल्यानंतर



जेकब हमर आणि मेलोडी हमर या दोघांना अटक करण्यात आली.

बोटीची कसून तपासणी केली असता बांबूच्या तराफ्याखाली ५३० साबणाच्या पेट्यांमध्ये लपवलेले ६.१४९ किलो उच्च दर्जाचे हेरॉइन आढळून आले. आंतरराष्ट्रीय बाजारात या हेरॉइनची किंमत अंदाजे १२.५ कोटी रुपये आहे.

सुरुवातीच्या तपासात स्पष्टपणे दिसून आले आहे की, हे सर्व ड्रग्ज म्यानमारमधून आले होते आणि हमरखौलियान-फुलेर्टल-लखीपूर पट्ट्यातील तस्करांपर्यंत पोहचवली जात होती. जिथून ती विविध नेटवर्कना पुरवली जाणार होती. एनसीबीचे म्हणणे आहे की नदीकाठच्या मार्गांचा वापर तस्करीच्या नवीन पद्धतीचे प्रतिबिंबित करतो, ज्यामुळे सुरक्षा एजन्सींसाठी एक नवीन आव्हान निर्माण झाले आहे.

अटक केलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर केले जाईल आणि जप्त केलेले हेरॉइन पुरावे म्हणून सादर केले जाईल. या नेटवर्कमध्ये सहभागी असलेल्या इतरांना ओळखण्यासाठी आणि अटक करण्यासाठी एनसीबी पुढील तपास करत आहे. या कारवाईमुळे आंतरराष्ट्रीय ड्रग्ज मार्गाचा एक महत्त्वाचा भागच विस्कळीत होत नाही तर तस्कर आता भौगोलिक असुरक्षिततेचा कसा फायदा घेत आहेत हे देखील दिसून येते.

# प्रतिष्ठान महाविद्यालयात एचआयव्ही विरोधी जनजागृती कार्यक्रम संपन्न




➤ पैठण : सर्जेराव खडसन

पैठण शहरातील प्रतिष्ठान महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने एचआयव्ही विरोधात कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे हे होते. तर या कार्यक्रमास प्रो. राजेश करपे, प्रो. शोभा मद्रेवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एचआयव्ही/एड्स च्या विरोधी जनजागृती कार्यक्रमात महा विद्यालयाच्या स्पोर्ट विभागाचे प्रमुख डॉ वसंत झेंडे यांनी एचआयव्ही व एड्स का वाढत आहे यासंदर्भात उपस्थितांना विशेष मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आयोजन व त्याच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार वैराटे, डॉ. सुभाष राठोड व डॉ. महानंदा राऊत यांनी विशेष असे परिश्रम घेतले. यावेळी प्रतिष्ठान महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनी तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक व स्वयंसेविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रा से यो कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार वैराटे यांनी तर आभार रा से यो स्वयंसेवक विशाल बारे यांनी करून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

उपळी जि.प. गटात राष्ट्रवादी काँग्रेसकडून...

# आ. सोळंकेंचे निष्ठावान उत्तम पवार यांच्याच नावाची चर्चा

➤ माजलगाव : प्रतिनिधी

उपळी जि.प. गटात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून आ. प्रकाश दादा सोळंके व जयसिह भैयांचे कट्टर समर्थक सामाजिक कार्यकर्ते उत्तमराव पवार यांच्याच नावाची जोरदार चर्चा होत असुन, आ. सोळंके यांनी पवार यांनाच पक्षाची अधिकृत उमेदवारी देऊन, त्यांना काम करण्याची संधी द्यावी. अशी मागणी या गटातील अनेक गावातील कार्यकर्त्यांसह नागरिकांनी केली आहे.



आरक्षण सोडतीत उपळी जि.प. गट ओबीसी प्रवर्गातील महिलेसाठी आरक्षित झाला आहे. या गटातुन आ. प्रकाश दादा सोळंके व जयसिंह भैया सोळंके समर्थक व जेष्ठ कार्यकर्ते उत्तमराव पवार यांच्या नावाची चर्चा मतदार करत आहेत. उत्तमराव पवार हे राजकारणात सक्रिय झाल्यापासून ते आजतागायत आ. सोळंके यांच्या सोबत असुन, ते बंजारा समाजातील आहेत. त्यांनी आ. सोळंके यांच्या प्रत्येक निवडणुकीत त्यांना मताधिक्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत मतांनी आघाडी मिळवून दिलेली आहे. तसेच त्यांनी या गटात सर्व समाजाच्या लोकांना सोबत घेत



आपले कार्य करत आहेत. त्यांनी कधीच कोणत्याही पदाची आपेक्षा न करता आपल्या नेत्याला साजेसे असेच काम केले असुन, करत आहेत. आ. सोळंकेंनी दिलेली प्रत्येक जबाबदारी पार पाडत त्यांचा विश्वास संपादन करत जनतहिताचे काम करत लोकांचे मुलभूत प्रश्न सोडवण्यास कायम प्रयत्नशील असतात. अशा या कायम लोकांच्या संपर्कात राहुन व कोणत्याही पदाची आपेक्षा न ठेवता काम करणाऱ्या उत्तमराव पवार यांना आ. प्रकाश दादा सोळंके व जयसिह भैया सोळंके यांनी पवार यांच्या नि:स्वार्थ कार्याची दखल घेऊन, त्यांना उपळी जि.प. गटात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाकडून अधिकृत उमेदवारी दिल्यास ते निश्चितच विजयी होऊन, जनतेची सेवा करतील. त्यामुळे इतर कुणालाही उमेदवारी देता सोळंके यांनी पवार यांनाच उमेदवारी द्यावी. अशी मागणी उपळी जि.प. गटातील गावागावातील कार्यकर्त्यांसह नागरिक करत आहेत.

# छत्रपती संभाजीनगर शहरात "सकल सोनार समाज वतीने आक्रोश मोर्चा"; न्यायासाठी सर्व समाज येणार रस्त्यावर !

## ➤ ५ डिसेंबर २०२५, सकाळी १० वाजता, क्रांती चौक आम्हाला आश्वासन नको, न्याय हवा !

➤ छत्रपती संभाजीनगर : नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे येथील कु. यज्ञा दुसाने (वय ४) हिच्यावरील बलात्कार व निर्घृण खून प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथे ५ डिसेंबर २०२५, सकाळी १० वाजता, क्रांती चौक, छत्रपती संभाजी नगर आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले असून मोर्चा त सहभागी होण्यासाठी मराठवाड्यातील बहुसंख्य सर्व शाखीय सोनार समाज बांधव आणि भगिनी, शहर तसेच ग्रामीण भागातील सर्व जाती धर्माच्या बांधवांनी" मोर्चामध्ये सहभागी व्हावे" असे आवाहन सकल सोनार समाज मराठवाडा तर्फे करण्यात आले आहे. आक्रोश




हा न्यायासाठी, आक्रोश हा क्रूरतेला विरोध, करण्यासाठी, आक्रोश हा सरकारला जागे करण्यासाठी, चला तर एकच आवाज, हीच वेळ, समाजाला जागे करण्यासाठी, "मराठवाडा स्तरीय भव्य आक्रोश मोर्चा, कु यज्ञा दुसाने. या बाळासाठी, तिच्या न्याय मिळविण्यासाठी, आक्रोश मोर्चा चे आयोजन केले आहे. हा मोर्चा क्रांती चौक ते विभागीय आयुक्त कार्यालय असा निघणार असून सुरवातील सर्वांनी क्रांती चौक येथे एकत्र यायचे आहे. तरी सर्व समाज बांधवानी जास्तीत जास्त संख्येने सामील व्हावे असे आवाहन सकल सोनार समाज मराठवाडा तर्फे करण्यात आले आहे.

# श्री दत्त महाराज जयंती निमित्त श्री सद्गुरू गहीनीनाथ महाराज देवस्थान, सावंगी येथे महाप्रसादाचा कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर : सर्व भाविक भक्तांना कळविण्यात येथे गुरूवार दिनांक ०४/१२/२०२५ रोजी निमित्त श्री सद्गुरू गहीनीनाथ बाबा येथे श्री दत्त जयंती निमित्ताने पौर्णिमा बैठक दुपारी ११:३० वाजता सुरू होणार असून श्री दत्त जयंती निमित्ताने चैतन्य सदगुरु श्री गहीनीनाथ महाराज देवस्थान (श्रध्दास्थान) सावंगी-हर्सूल कृष्णापुरवाडी, मातोश्री शाळे पासून पुढे वाडी कोलढाण रोड, छत्रपतीसंभाजीनगर या ठिकाणी महाप्रसादाचे हि आयोजन केले आहे.



# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |

## त्यांच्या वाणीतून....

जागतिक मोटर वाहने उद्योगातील नामवंत ओसामु सुझुकी यांच्या निधनामुळे तीव्र दु:ख झाले आहे. त्यांनी दूरदृष्टीने केलेल्या कामामुळे वाहतुकीविषयीचा जागतिक दृष्टिकोन बदलला. त्यांच्या नेतृत्वाखाली सुझुकी मोटर कॉर्पोरेशन उद्योग आव्हानांचा सामना करीत, नवोन्मेषाधारे व्याप्ती वाढवित जागतिक ऊर्जाकेंद्र बनला. भारताप्रती त्यांना अतीव आपुलकी होती आणि मारुतीसह त्यांच्या सहयोगाने भारतीय मोटर वाहन उद्योगात क्रांती झाली.

– पंतप्रधान नरेंद्र मोदी

## सुविचार

ज्याला आपल्या पापांचा पश्चात्ताप झालेला असतो तो जवळजवळ निष्पापच समजावा. – सिनेका

अतिक्रान्तं हि यत्कार्य पश्चाचिंतयते नर: तच्चास्य न भवेत्कार्य चिंतया च विनश्यति ।

(कर्णपर्व, अध्याय 31, फोक 29 महाभारत)

अर्थ : घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

## उपदेशकथा



### भगवान

एका फकिराला एकदा स्वप्न पडले. स्वप्नात तो स्वर्गात गेला. तेथे रस्त्यावर मोठी गर्दी झालेली त्याला दिसली. त्या गर्दीतील एकाला त्याने विचारले, एवढे लोक का जमले आहेत? त्या व्यक्तीने सांगितले, आज भगवानांचा जन्मदिन आहे. ते येथून जाणार आहेत. \किराला आपल्या भाग्याचा हेवा वाटला. साक्षात भगवानाचे दर्शन घडणार. थोड्या वेळाने एका उमद्या घोड्यावरुन एक राजबिंडा तरुण आला. त्याच्यामागे हजारो लोक होते. त्याला पाहून फकिराने विचारले, हेच का ते भगवान? ती व्यक्ती म्हणाली, नाही हे भगवान नाहीत. हे राम आहेत. त्यांना मानणारे लोक त्यांच्यामागून जात आहेत... याच पद्धतीने येशू, बुद्ध, महावीर... सर्वजण येऊन गेले. भगवानांची वाट पाहता पाहता मध्यरात्र झाली. सारे लोक कंटाळून निघून गेले. आणि त्या निर्मनुष्य रस्त्यावरुन एक म्हातारा एकटाच आला. फकिराने त्याला विचारले, आपणच भगवान? म्हातारा म्हणाला, हो. फकिराने विचारले, मग आपल्यामागून कोणीच कसे येत नाही? डोळ्यात अश्रू आणत तो म्हातारा म्हणाला, सारे राम, महावीर, बुद्ध, येशूबरोबर गेले. जो कोणाबरोबर जात नाही, तोच माझ्याबरोबर येऊ शकतो

## गुरु वचन

### प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धेची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.




### विशेष कारणासाठी पुतिन देणार भारताला भेट! असे असेल पुतिन यांचे वेळापत्रक

नवी दिल्ली : भारत आणि रशियामधील धोरणात्मक भागीदारीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन ४–५ डिसेंबर रोजी भारत दौऱ्यावर येणार आहेत. २०२२ मध्ये युक्रेनविरुद्ध रशियाच्या विशेष लष्करी कारवाईला सुरुवात झाल्यानंतर हा त्यांचा पहिलाच भारत दौरा असेल. दोन्ही देशांमधील ही तेवीसावी द्विपक्षीय शिखर परिषद असेल, जी दोन्ही बाजूंनी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. राष्ट्राध्यक्ष पुतिन ४ डिसेंबर रोजी संध्याकाळी नवी दिल्लीत पोहोचतील, जिथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७ लोक कल्याण मार्ग या सरकारी निवास आणि कार्यालयात संध्याकाळी ७ वाजता एका खाजगी भोजनाचे आयोजन केले आहे. दुसऱ्या दिवशी म्हणजे ५ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता दिल्ली येथील राष्ट्रपती भवनाच्या प्रांगणात पुतिन यांचे औपचारिक स्वागत केले जाईल आणि त्यांना तिन्ही दलांच्या तुकडीकडून गार्ड ऑफ ऑनर दिला जाईल. यानंतर सकाळी १० वाजता, पुतिन महात्मा गांधींना श्रद्धांजली वाहण्यासाठी राजघाटावर पोहोचतील.

# काही तुरळक प्रकार वगळता माजलगाव न.प.चे मतदान शांततेत

## ➤ ४०,८५८ पैकी ३१,२६३ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क ➤ ७६.५१ टक्के मतदान

➤ **माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

माजलगाव नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा पदासह २६ नगरसेवकांच्या निवडीसाठी रविवारी पार पडलेल्या निवडणुकीत एकूण ४०,८५८ पैकी ३१,२६३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. काही किरकोळ प्रकार वगळता संपूर्ण मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असून ७६.५१ टक्के मतदान झाल्याची माहिती निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली.

गेल्या आठ–दहा दिवसांपासून शहरात प्रमुख पक्षांसह अपक्ष उमेदवारांचा प्रचार जोरदार सुरु होता. विविध नेत्यांच्या प्रचारसभांमधून आरोप–प्रत्यारोपांचे फटके झडले असले तरी विकासाच्या मुद्द्यांवर विशेष चर्चा न झाल्याची खंत मतदार व्यक्त करत आहेत. तिरंगी लढतीत विजय कोणाच्या माथी माळला जाणार, याबाबत अजूनही अनिश्चितता दिसत आहे.

मतदानाला शहरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रविवारी सकाळपासून मतदारांच्या रांगा दिसून येत होत्या. प्रत्येक प्रभागात समसमान उत्साहाचे चित्र पाहायला मिळाले.

### - प्रभागनिहाय मतदानाचा तपशील :

प्रभाग निहाय झालेले मतदान खालील प्रमाणे आहे




- १) एकूण मतदान ३६३८ झालेले मतदान २६३३ टक्केवारी ७२ %
- २) एकूण मतदान ३१४२ झालेले मतदान २३९२ टक्केवारी ७६ %
- ३) एकूण मतदान ३६८९ झालेले मतदान २९०५ टक्केवारी ७८%
- ४) ऐकून मतदान २२८८ झालेले मतदान १६९४ टक्केवारी ७४ %
- ५) एकूण मतदान २९५५ झालेले मतदान २२२२ टक्केवारी ७५ %
- ६) एकूण मतदान २८५५ झालेले मतदान २१८१ टक्केवारी ७६ %
- ७) एकूण मतदान २६३३ झालेले मतदान २०४० टक्केवारी ७७ %
- ८) एकूण मतदान ३०५० झालेले मतदान २३५५ टक्केवारी ७७%
- ९) एकूण मतदान ३३४१ झालेले मतदान २६९५ टक्केवारी ८० %
- १०) एकुण मतदान ३८३० झालेले मतदान २९४६ टक्केवारी ७६ %
- ११) एकूण मतदान ३३२५ झालेले मतदान २५२९ टक्केवारी ७६ %
- १२) एकूण मतदान २८५० झालेले मतदान २१५२ टक्केवारी ७५ %
- १३) एकूण मतदान ३२६५ झालेले मतदान २५१९ टक्केवारी ७७ %

या प्रमाणे आहे प्रभाग क्रमांक ९ मध्ये सर्वाधिक ८०% मतदान झाले, तर प्रभाग १ मध्ये सर्वांत कमी ७२% मतदान झाल्याचे नोंद.

# रांजणी ते तुळजापुर पायी पालखी सोहळ्याचे तेलगावात स्वागत



➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

जालना जिल्ह्यातील रांजणी ते तुळजापुर जाणाऱ्या पायी पालखी सोहळ्याचे तेलगाव येथे संपत्ती लगड, रतन लगड व परिवाराच्या वतीने स्वागत करून पालखी सोहळ्यात सहभागी लोकांना चहा नाष्ट्याची व्यवस्था लगड परिवाराने केली. जालना जिल्ह्यातील रांजणी येथील तुळजी भवानी संस्थान आईचा मळा या संस्थानचा अनेक वर्षांपासुन प्रतीवर्षी तुळजापुर येथील तुळजाभवानी देवीला पायी पालखी सोहळा जात असतो. त्याप्रमाणेच याही वर्षी तुळजाभवानी संस्थान आईचा मळा रांजणी येथुन दि.२८ नोव्हेंबर रोजी पायी पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाले. सदर पायी पालखी सोहळा दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी तेलगाव येथे संपतराव लगड यांच्या येथे आगमन झाले. यावेळी लगड परिवारातील संपतराव लगड, रतन लगड, सुदर्शन लगड यांनी पालखी सोहळ्याचे जंगी स्वागत करून मनोभावे तुळजाभवानी देवीची पुजाआर्चा करून आरती केली. त्यानंतर पालखी सोहळ्यात सहभागी भक्तांना चहा नाष्ट्याची व्यवस्था केली. लगड परिवाराची ही सेवा घेतल्यानंतर पालखी सोहळा तुळजापुरच्या दिशेने प्रस्थान झाला. यावेळी गावातील भाविक भक्तांनी पालखीचे दर्शन घेतले.

# संगम येथील डापकर वस्ती शाळेत शिक्षकच गैरहजर असल्याने शाळेला कुलूप!

## ➤ वरिष्ठ अधिकारी कारवाई करतील का?

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

संगम येथील डापकर वस्तीत असलेल्या वस्ती शाळेत सकाळी शाळा भरण्याची वेळ झाली तरी सुध्दा दोन पैकी एकही शिक्षक हजरच नसल्याने या शाळेला सोमवारी कुलूपच होते.. केवळ विद्यार्थीच हजर होते. अशा व बेपर्वाई व गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांवर शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी कारवाई करतील का? असा सवाल पालकांसह नागरिक करत आहेत. या शाळेतील गैरहजर शिक्षकांवर कारवाई केली नाही तर शिक्षण विभागाच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल. असा इशारा शिक्षण प्रेमी नागरिकांनी दिला आहे.

यासंदर्भात समजलेली माहिती अशी की, तेलगाव पासुन जवळच असलेल्या संगम ता. धारूर येथील डापकर वस्तीत वस्ती शाळा असुन, तेथे दोन शिक्षक कार्यरत आहेत. धारूर तालुका गटशिक्षणाधिकारी कार्यालया अंतर्गत येत असलेल्या या वस्ती शाळेत सोमवारी सकाळी शाळा भरण्याची वेळ होऊन गेली तरी सुध्दा दोन पैकी एकही शिक्षक शाळेत हजर झाला नव्हता. त्यामुळे शनिवारी शाळेला लावलेले कुलूप सोमवार उजडला तरी ही उघडले नव्हते. तेथे फक्त विद्यार्थीच हजर झाले होते. त्या विद्यार्थ्यांकडे चौकशी केली असता शिक्षक सतत उशीरा येतात व लवकर जातात. असे उत्तर विद्यार्थी देत होते. येथे दोन शिक्षक कार्यरत असुन, ते आपल्या मनमानी नुसार ड्युटी करत असल्याचे दिसते. त्यांना विद्यार्थ्यांप्रती कोणतीच सहानुभुती दिसत नाही. शाळेच्या वेळेत ते सतत गैरहजर राहत असल्याचे कांही पालकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले. अशा बेपर्वा शिक्षकांवर शिक्षण विभागाने कडक व दंडात्मक कारवाई करणे अवश्यक असल्याचेही त्या पालकांनी म्हटले. येथील शिक्षक हे त्यांच्या विरोधात कुणी शिक्षण विभागाकडे तक्रार केली तर तक्रारदारास धमकीही देत असल्याची चर्चा ऐकावयास मिळाली. त्यामुळे अशा बेजबाबदार व बेपर्वाई करणाऱ्या व शाळेत सतत गैरहजर राहणाऱ्या संगम येथील डापकर वस्तीतील वस्ती शाळा शिक्षकांवर धारूर तालुका गटशिक्षणाधिकारी यांनी कडक व दंडात्मक कारवाई करावी. अशी मागणी शिक्षण प्रेमी नागरिकांनी केली आहे. जर या शिक्षकांवर कारवाई झाली नाही तर शिक्षण विभागाच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल.




### अशा बेजबाबदार शिक्षकांमुळेच शिक्षण विभाग बदनाम

● संगम येथील डापकर वस्ती शाळेत शाळा भरण्याची वेळ होऊन ही शाळेतील कार्यरत दोन शिक्षकांपैकी एकही शिक्षक हजर नव्हता. त्यामुळे येथील विद्यार्थी शिक्षकांविना शाळेत हजर झाले. अशा बेजबाबदार शिक्षकांमुळेच शिक्षण विभाग बदनाम होत असुन, शिक्षण विभागाने शिक्षण विभागाची बदनामी टाळण्यासाठी डापकर वस्ती शाळेतील गैरहजर राहणाऱ्या दोन्ही शिक्षकांवर तात्काळ कारवाई करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करावी. अशी मागणी शिक्षण प्रेमी नागरिक करत आहेत.

# उपळी जि.प.गटात भाजपकडून राजेश राठोड उमेदवारीची जोरदार चर्चा

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**



उपळी जि.प.गटात भाजप व मित्रपक्षाकडुन युवानेतृत्व राजेश राठोड यांच्याच नावाची गावागावात जोरदार चर्चा होत असुन, पक्ष नेतृत्व ना. पंकजाताई मुंडे यांनी राजेश राठोड सारख्या तरूण व नि:स्वार्थी कार्यकर्त्यासच अधिकृत उमेदवारी द्यावी. अशी मागणी भाजप कार्यकर्त्यांसह नागरिक करत आहेत.

धारूर, वडवणी व माजलगाव या तीन तालुक्यातच्या सिमेवर असलेल्या उपळी जि.प.गट ओबीसी महिलेसाठी आरक्षित झाला आहे. येथुन भाजपकडुन सर्वसामान्य व निस्वार्थी कार्यकर्ते असलेले राजेश राठोड यांच्या नावाची गावागावात जोरदार चर्चा होत चालु असुन, या गटाच्या सर्वांगीण विकासासाठी राजेश राठोड सारख्या नेतृत्वाची गरज असल्याची भावना येथील मतदार व्यक्त करत आहेत. राजेश राठोड हे तळागाळातील लोकांशी थेट संपर्क असलेले व सर्वसामान्य जनतेचे मुलभूत प्रश्न सोडवण्यास कायम प्रयत्नशील असलेले व्यक्तीमत्व आहे. त्यांनी कुठलेही पद नसताना सर्वसामान्यांचे शासन दरबारी प्रलंबित असलेले अनेक प्रश्न मार्गी लावले. तसेच कुठल्याही सामाजिक कार्यात अग्रेसर राहुन, जनहितासाठी कायम काम करत असतात. असे हेशनि:स्वार्थी व्यक्तीमत्व असुन, त्यांच्या अशा समाजसेवी वृत्तीमुळेच त्यांनी उपळी जि.प.गटातुन भाजपकडून निवडणूक लढवावी. अशी मागणी मतदार नागरिक करत आहेत तसेच या गटातुन ना. पंकजाताई मुंडे यांनी राजेश राठोड सारख्या तरूण नेतृत्वाच्या कार्याची दखल घेऊन त्यांनाच उमेदवारी देऊन, जनसेवा करण्याची संधी द्यावी. अशी मागणी ही उपळी जि.प.गटातील गावागावातुन मतदार नागरिक करत आहेत.

# वयोवृद्ध इसमाचे कुजलेल्या अवस्थेत प्रेत सापडले घटनास्थळावर पोलिसांनी धाव घेत ओळख पटवली



माजलगाव : माजलगाव तालुक्यातील नित्रुड नजदीक कुजलेल्या अवस्थेत एका वयोवृद्धाचे प्रेत सापडल्याची घटना सोमवारी दुपारी उघडकीस आली. दरम्यान दिंद्रुड पोलिसांनी घटनास्थळावर धाव घेत मयताची ओळख पटवली असून इसमाचा मृत्यू कशामुळे झाला यासाठी तपास सुरू केला आहे. पालखी महामार्गावरील माजलगाव ते तेलगाव राज्य महामार्गावर नित्रुड शिवारातील एका पडकात दुर्गंध येत असल्याकारणाने स्थानिकांनी पाहिले असता मयत झालेल्या एका इसमाचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत आढळून आले. या माहितीवरून दिंद्रुड पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत मयताची ओळख त्याच्या खिशातील कागदपत्रावरून पटवण्यात यश मिळवले. बाबू रानबा तिडके (वय ६९ वर्ष) रा. रामनगर, गोविंदवाडी ता. माजलगाव हे मयताचे नाव असून सोमवारी सायंकाळी घटनास्थळावर मयताचे नातेवाईक दाखल झाले होते. प्रेत कुजलेल्या अवस्थेत असल्याने पात्रुड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल मायकर यांनी घटनास्थळीच शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात दिले. अंदाजे सहा ते सात दिवसांपूर्वी तिडके यांचा मृत्यू झाल्याचा अंदाज डॉक्टरांनी वर्तवला आहे. दरम्यान ही घटना नेमकी कशामुळे घडली याचा तपास दिंद्रड पोलीस करीत असून घटनास्थळावर दोन विषाच्या व १ दारूची बाटली सापडल्याची माहिती दिंद्रड पोलीस स्टेशनचे सपोनि महादेव ढाकणे यांनी दिली आहे.

# माजलगाव शहरात जीपमध्ये सहा लाख रुपये पकडले

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची कारवाई ➤ २४ तासांनंतरही गुन्हा दाखल नाही

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात माजलगाव शहरात सोमवारी रात्री मोठी खळबळ उडाली. बायपास रोडवर एका जीपमध्ये ठेवण्यात आलेले सहा लाख रुपये निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांनी पकडून जप्त केले. ही रक्कम नेमकी कोणाची होती, याबद्दल शहरात उलटसुलट चर्चा सुरू आहे.

सोमवारी प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने उमेदवारांकडून वेग वाढला होता. सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास बायपास रोडवरील तबेल्यासमोर उभ्या असलेल्या एका जीपमध्ये (एमएच २० ईके १५५५) पैशांचे वाटप केले जात असल्याची तक्रार निवडणूक निर्णय अधिकारी गौरव इंगोले यांना मिळाली. या तक्रारीवरून त्यांनी तातडीने सदर ठिकाणी धाव घेऊन जीपची तपासणी केली असता, गाडीत सहा लाख रुपये आढळून आले. हे पैसे त्यांनी तत्काळ जप्त केले असून, वाहन कोणाचे होते आणि पैसे कोणासाठी होते, याची चौकशी सुरू आहे.



मुख्याधिकारी सुंदर बोंदर यांनी माहिती दिली की, सदर व्यक्तीस या पैशांचा हिशोब देण्यास सांगितले आहे. मात्र, ही रक्कम व वाहन जप्त होऊन २४ तासांहून अधिक काळ लोटला असतानाही याप्रकरणी अद्याप गुन्हा दाखल नव्हता. यामुळे या प्रकरणाची गंभीरता वाढली आहे.

# दिल्लीतील राष्ट्रीय कार्यशाळेसाठी सामाजिक कार्यकर्त्या व सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सत्यभामा सौंदरमल यांची निवड

➤ ‘शी लीड्स भाग ३’ उदयोन्मुख महिला नेता म्हणून होणार सहभाग

माजलगाव / प्रतिनिधी :

महिला नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर बळकटी देण्यासाठी आयोजित ‘शी लीड्स भाग ३ – उदयोन्मुख महिला नेत्या’ या दोन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेसाठी बीड जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्त्या आणि लोकप्रिय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सत्यभामा भुजंग सौंदरमल यांची निवड झाली आहे. ही कार्यशाळा दिनांक ४ आणि ५ डिसेंबर रोजी दिल्ली येथे होत आहे.

देशभरातील ७०० हून अधिक महिला कार्यकर्त्यांमधून केवळ ३० उदयोन्मुख महिला नेत्या या कार्यशाळेसाठी निवडल्या गेल्या असून, त्यामध्ये सत्यभामा सौंदरमल यांचा समावेश झाल्याने बीड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात आनंद व्यक्त होत आहे.

### महिला नेतृत्वाला नवसंजीवनी देणारी पुढाकार

● आयोजकांच्या म्हणण्यानुसार, दिल्लीतील ही कार्यशाळा देशभरातील उदयोन्मुख महिला नेत्यांना नवीन विचार, नेतृत्वकौशल्ये आणि प्रभावी संवादकौशल्यांचे प्रशिक्षण देऊन महिला नेतृत्वाला राष्ट्रीय स्तरावर नवी दिशा देणार आहे. सहभागी झालेल्या महिलांमार्फत त्यांच्या परिसरातही नेतृत्व विकासाची प्रेरणा मिळेल, असा organizers चा विश्वास आहे.

● सत्यभामा सौंदरमल यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाची आणि कौतुकाची वाहती गंगा सुरू आहे

### “राष्ट्रीय पातळीवर नेतृत्वाची नवी दिशा मिळणार” – सत्यभामा सौंदरमल



या अनोख्या निवडीबद्दल भावना व्यक्त करताना सत्यभामा सौंदरमल म्हणाल्या : “देशभरातील शेकडो महिलांमधून माझी निवड होणे ही माझ्यासाठी मोठी उपलब्धी आहे. दिल्लीतील या राष्ट्रीय कार्यशाळेमुळे राज्य आणि देशातील राजकारण संवैधानिक मार्गाने करण्यासाठी आवश्यक दिशा, रणनिती आणि नेतृत्वाचे प्रशिक्षण मिळणार आहे. महिला लीडरशिप पुढे आणण्यासाठी हा अनुभव अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.”

